# प्रेस नोट

ता. ०९/०८/२०१७

## पंचायत समीतीचे उप सभापती यांचा खुन करण्याकरिता फंड गोळा करण्यासाठी दरोडा टाकण्याच्या तयारीत असतांना गॅंगस्टर सह ९ जणांना गुन्हे शाखा युनिट २ कडुन अटक

गुन्हे शाखा युनिट २ प्रभारी अधिकारी सतिश निकम व सहा पोलीस निरीक्षक अन्सार शेख यांना बातमी मिळाली कि, “ हिंजवडी माण रोडवरील लक्ष्मी पेट्रोलपंप, माण येथे पेट्रोलपंपावर दरोडा टाकुन रक्कम लुटण्याकारिता आरोपी येणार आहेत. ” अशी बातमीदारामार्फत बातमी मिळाताच सदरची माहिती सतिश निकम यांनी प्रदिप देशपांडे अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पोलीस उप आयुक्त, सुधीर हिरेमठ, सहा पोलीस आयुक्त, सुरेश भोसले यांना कळवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली सदर ठिकाणी छापा टाकुन आरोपींना जेरबंद करण्याकरिता सतिश निकम व ३ सपोनि, १ पोसई, व २१ कर्मचारी असे माण येथे गुन्हे शाखा पुणे शहर येथुन रवाना होवुन, ज्या ठिकाणी आरोपी पेट्रोल पंपाची रक्कम लुटण्यासाठी येणार आहेत त्याठिकाणी जावुन दबा धरुन बसले असतांना थोडया वेळाने सदर ठिकाणी अंधारात एक मारुती स्वीफ्ट कार, एक मारुती रिट्स कार व दोन मोटर सायकल येवुन थांबल्या त्यातुन ७ ते ८ लोक उतरुन तोंडावर मंकी कॅप घालुन लक्ष्मी पेट्रोलपंपाचे समोर अंधारात थांबुन पंपावरील रेखी करत असतांना व त्यांचेमध्ये चाललेल्या संभाषणावरुन मिळालेल्या बातमीतील संशयीत आरोपी हेच असल्याचे खात्री झाल्याने छापा टाकुन एकुण ९ जणांना ताब्यात घेतले व त्यांची पंचासमक्ष त्यांचे नाव व गाव विचारले असता त्यांनी आपली नावे १) उमेश रधुनाथ वाघुलकर वय ३८, रा. माण, ता. मुळशी, जि. पुणे २) योगेश भाऊ गुरव वय ३२ रा. विकास मित्रमंडळ चौक लेन नं २, कर्वेनगर, पुणे ३) योगेश अंकुश वेताळ वय २३ रा. मलठण, जिल्हा परिषद शाळेजवळ, ता. शिरुर, जि पुणे, ४) विशाल नवनाथ वेताळ वय २३ रा. मलठण, जिल्हा परिषद शाळेजवळ, ता. शिरुर, जि पुणे ५) विशाल आनंदा कळसकर वय १९ रा. मलठण, ता शिरुर जि पुणे ६) चंद्रकांत दोरसिंग थापा वय ३५ रा. नामदेव लोंढे चाळ, कासारवाडी, पुणे ७) फिरोज आयुब खान वय ४० धंदा ड्रायव्हर रा. दळवीनगर, चिंचवड, पुणे ८) अन्वर हसन मुलाणी वय ४० धंदा ड्रायव्हर, रा. रावेतगाव, भोंडवे वस्ती, रोशन बंगला, पुणे ९) आकाश प्रकाश रेणुसे वय २२ धंदा शेती रा. पाबे, ता. वेल्हा जि. पुणे अशी सांगितली त्याची त्यांची अंगझडती घेतली असता त्यांचे कब्जात **एकुण ५ पिस्टल, १ रिव्हॉल्वर, २८ राउन्ड, ४ कोयते,** अशी हत्यारे मिळुन आली तसेच त्यांनी गुन्हयाचे कामी वापरलेली एक पांढ-या रंगाची मारुती स्वीफ्ट कार नं एम एच १४/ बी एक्स ३४२१, एक पांढ-या रंगाची मारुती रिट्स कार नं. एम एच १२/ एन बी १७९२, एक काळया रंगाची बजाज पल्सर नं. एम एच १४ ए पी १४१८, एक काळया रंगाची बजाज पल्सर १५० नं. एम एच १४ ए पी १४१८ अशी चार वाहने असे **एकुण १२,२६,०००/-** रुपयाचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

सदर आरोपींना ताब्यात घेवुन त्यांचेकडे चौकशी केली असता सदर सर्व आरोपींना यातील मुख्य आरोपी नामे उमेश रधुनाथ वाघुलकर वय ३८, रा. माण, ता. मुळशी, जि. पुणे याने जमा केले असुन त्याचे व माण येथील राहणार पंचायम समीती मुळशीचे उप सभापती पांडुरंग वझरकर याचे राजकारणातुन व स्थानिक भांडण आहे व त्या भाडणांचे कारणावरुन पाडुरंग वझरकर यास जिवे ठार मारण्यासाठी सर्व तयारी केली असुन सर्व सदस्याना पाडुरंग वझरकर यास ठार मारल्यानंतर प्रत्येकी २ लाख रुपये देण्याचे उमेश रधुनाथ वाघुलकर याने कबुल केले होते व सदरची रक्कम जमा करण्यासाठी ते लक्ष्मी पेट्रोंल पंपावर दरोडा टाकण्यासाठी आल्याचे त्यांनी कबुली दिली आहे.

तसेच सदर आरोपीमध्ये आरोपी नामे योगेश भाऊ गुरव वय ३२ रा. विकास मित्रमंडळ चौक लेन नं २, कर्वेनगर, पुणे हा शरद मोहोळ गॅंगचा सदस्य असुन तो सध्या गणेश मारणे खुन खटल्यामध्ये लागलेली शिक्षा भोगत आहे. तो ५ मे रोजी ३० दिवसाचे पॅरोल रजेवर सुटला असुन पॅरोल रजा संपली असतांना परत हजर न होता फरारी आहे.

Pune Police

सदरची कामगिरी मा. श्री प्रदिप देशपांडे अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पोलीस उप आयुक्त, श्री सुधीर हिरेमठ, सहा पोलीस आयुक्त, श्री सुरेश भोसले यांचे मार्गदर्शप्रमाणे गुन्हे शाखा युनिट २ चे पोलिस निरीक्षक सतिश निकम, सपोनि अन्सार शेख, खंडणी विरोधी पथकाचे सपोनि विठ्ठल शेलार, युनिट ४ चे सपोनि गणेश पाटील, युनिट १ चे पोसई पाटील, युनिट २ मधील कर्मचारी - सपोफौ मोरे, तांबे, पो हवा गडांकुश, खराडे, शेख, पठाण, पो ना भिलारे, नरुटे पो शि जंगीलवाड, फरांदे, खंडणी विरोधी पथकामी कर्मचारी - पो हवा गरुड, घुले, पवार पो ना अहिवळे अभंगे, युनिट १ मधील कर्मचारी - पो ना वाघवले, मोमीन, खडके, युनिट ४ मधील कर्मचारी - पो हवा मचे, दळे, आवटे, शेख व पोशि हिरळकर यांनी केलेली आहे.




गुन्हे शाखा,युनिट-२, पुणे शहर